| | | |
|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | २४/०५/२०१८. |
| नोंदणी दिनांक | : | २४/०५/२०१८. |
| निकाल दिनांक | : | २४/०१/२०२०. |
| कालावधी | : | ०१ वर्षे, ०८ महिने. |
| निशाणी | : | २७ |

महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
३६ वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई
(न्यायनिर्णय कलम ३५५ फौ. प्र. सं. अन्वये)

| | | |
|---|---|---|
| (अ) | खटला क्रंमाक | :– ३२७/पीडब्ल्यू/२०१८.<br>MHMM26-000838-2018. |
| (ब) | अपराध घडल्याची तारीख | :– २५/०३/२०१८. |
| (क) | फिर्यादीचे नाव<br>(अभियोग पक्ष) | :– महाराष्ट्र सरकार,<br>द्वारा – वरिष्ठ पोलीस निरिक्षक,<br>लोहमार्ग पोलीस ठाणे, बांद्रा.<br>(गुन्हा नोंद क्र.–७२४/२०१८). |
| (ड) | आरोपीचे नाव | :– साबीर रशिद खान उर्फ बाबू..<br>वय :– २० वर्षे.<br>काम धंदा :– बेरोजगार.<br>रा.ठि.:– रूम क्र.३, ओसवाल नगर,<br>संयोग अपार्टमेंट, नालासोपारा (पू),<br>पालघर. |
| (प) | कोणत्या स्वरूपाचा गुन्हा आहे? | :– भारतीय दंड विधान कलम ३९२ प्रमाणे. |
| (फ) | आरोपीस गुन्हा कबुल आहे का? | :– आरोपी यास गुन्हा कबुल नाही. |
| (ब) | अंतिम आदेश | :– आरोपीस गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| (भ) | आदेशाचा दिनांक | :– २४/०१/२०२०. |

अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकिल :– श्री गायकवाड.
आरोपी तर्फे वकिल नाही. :– आरोपी स्वत:

न्यायनिर्णय दि.२४/०१/२०२०.

आरोपी विरूध्द् भारतीय दंड संहिता कलम ३९२ नुसार केलेल्या अपराधाबाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

२. सारांश स्वरूपात सरकार पक्षाचे प्रकरण कामी कथन पुढीलप्रमाणे आहे, दि.२५/०३/२०१८ रोजी, माहिती देणार श्रीमती बिना नरेश रिडलान, यांनी पोलीस ठाणे मुंबई सेंट्रल लोहमार्ग यांचेकडे तक्रार नोदविली कि, दि.२४/०३/२०१८ रोजी, ती, मुलासह, लोअर परेल, येथे गेली होती. दि.२५/०३/२०१८ रोजी, रात्री १२.५४चे दरम्यान, ती व तिचा मुलगा, फलाट क्र.१ वरून, बोरीवलीकडे जाणाऱ्या स्लो लोकलने प्रवास करीत निघाले. सदरची लोकल ०१.१५ वाजता, खार स्टेशनवरून निघताच, अनोळखी इसमाने तिचे हातातील फोन खेचला. त्या इसमाने तिचा मुलगा शुभम यास धक्का देवून व तिचे हाताला झटका देवून, मोबाईल फोन खेचला व चालू लोकलमधून ट्रॅकवर उडी मारून, तो पळू लागला. शुभमसुध्दा उडी मारून त्या इसमाचे पाठीमागे धावला. तेवढयात कोणीतरी लोकलची चैन ओढली. माहिती देणार सुध्दा खाली उतरली व दोघांनी त्या इसमाचा पाठलाग केला. तो इसम स्टेशनचे पश्चिम बाजूला असलेल्या खोलीचे छतावर जावून बसला. शुभमने त्या इसमास पकडले. त्याने मोबाईल बाबत काहीही माहिती दिली नाही, करीता त्यास बांद्रा पोलीस ठाणेत आणन्यात आले. त्या इसमाने त्याचे नाव शाबीर रशिद खान उर्फ बाबू, म्हणजे आरोपी, असे सांगितले.

३. सदर खबरीच्या आधारे आरोपी विरूध्द् गुन्हा नोंद क्रं. —७२४/२०१८, भारतीय दंड विधान कलम ३९२ असा दाखल झाला. आरोपीला गुन्ह्याकामी अटक करण्यात आली. आरोपीचा अंगझडती

पंचनामा व निवेदन पंचनामा तयार करण्यात आला. आरोपीच्या निवेदनानूसार चोरी झालेली मालमत्ता मिळून आली नाही. साक्षीदारांची बयाने नोंदवून, तपासाअंती आरोपी विरूध्द दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

४. आरोपी न्यायालयात गैरहजर राहिल्यामूळे त्याचा जामीन रदद करून त्यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले, म्हणून तो बंदिगृह आरोपी आहे. आरोपी विरूध्द् भारतीय दंड विधान चे कलम ३९२ च्या अपराधासाठी दोषारोप (नि.क्र.–११) निश्चित केला. दोषारोप आरोपीला त्याच्या बोली भाषेमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल केला नाही व खटला चालविण्यास (नि.क्र.–१२) अन्वये प्रतिपादन केले. त्यामूळे याचा खटला पुढे चालविण्यात आला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ नूसार बयान (नि.क्र.–२६) नोंदविण्यात आले. आरोपी निर्दोष असल्याचा त्याचा बचाव आहे.

५. घटनेच्या वेळची परिस्थिती व न्यायालयासमोर आलेले साक्षी पुरावे याचे अवलोकन करून, पुढील मुद्दे निर्धारित करण्यात आले, त्याचे कारणमिमांसेसह स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि दि. २५/०३/२०१८ रोजी, रात्री सुमारे ०१.१५ वाजता, खार लोहमार्ग स्थानक, फिर्यादी नामे बिना नरेश रिडलान हया लोअर परेल ते जोगेश्वरी डाऊन बोरीवली धीमी लोकलच्या | नाही. |

दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करत असताना, आरोपीने त्यांचे हातातील, त्यांचा ₹८०००/— (आठ हजार फक्त) किंमतीचा, सॅमसंग कंपनीचा, सोनेरी रंगाचा, मॉडेल क्र. जे—२, मोबाईल फोन, जबरदस्तीने त्यांच्या हाताला हिसका देवून, धक्का बुक्की करून चोरी केला आणि त्या अनुषंगाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३९२ नुसारचा गुन्हा केला आहे ?

२ आदेश काय झाला? — अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

६. आरोपी विरूध्द् दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने चार साक्षीदारांची म्हणजेच (स.सा.क्र.—१) बिना नरेश रिडलान (फिर्यादी) यांची साक्ष (नि. क्र.१४) वर, (स.सा.क्र.—२) शुभम नरेश रिडलान यांची साक्ष (नि. क्र.१६) वर, (स.सा.क्र.—३) सुरेश दगडू वांद्रे (पंच) यांची साक्ष (नि. क्र.१९) वर व (स.सा.क्र.—४) पो.ऊ.नि. तानाजी संभाजी हारळे (तपासी अंमलदार) यांची साक्ष (नि. क्र.२३) वर नोंदविलेली आहे. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

### मुद्दे क्र.—१ ते २ नूसार :—

७. (स.सा.क्र.—१) बिनाचे पुराव्यात असे आले आहे की, दि.

२४/०३/२०१८ रोजी, ती जोगेश्वरी येथे, लोकलने जात असताना, खार स्टेशनजवळ, एका चोराने, तिचा मोबाईल फोन हिसकला व तो पळून गेला. तिचा मुलगा शुभम याने चोरास पकडले. सदर चोर स्टेशनवरील खोलीचे छतावर बसून होता. तिने चोरा विरूध्द प्रथमवर्दी (नि. क्र.१५) नोंदविली. घटनेला बरेच दिवस झाल्याने, ती त्या चोरास ओळखू शकत नाही. (स.सा.क्र.–१) बिनाचे पुराव्यावरून असे दिसून येते की, घटना तारीख, वेळी व ठिकाणी एका अज्ञात इसमाने तिचा मोबाईल चोरी केला होता. ती सदर चोरास ओळखण्यास असमर्थ आहे.

८. (स.सा.क्र.–२) शुभमने पुराव्यात सांगितले कि, दि. २४/०३/२०१८ रोजी, तो त्याचे आई सोबत, जोगेश्वरी येथे जाण्याकरीता लोकलने जात असताना, खार स्टेशनजवळ आरोपीने त्याचे आईचा मोबाईल फोन खेचला व तो पळून जावू लागला. त्याने त्यास खार स्टेशनजवळील छतावर पकडले व आरोपीस पोलीस ठाणेस घेवून गेला. या साक्षीदाराचे पुराव्यावरून असे दिसून येते कि, त्याने आरोपीला लगेच पकडले, परंतू आरोपी जवळ चोरीची मालमत्ता मिळून आली नाही.

९. (स.सा.क्र.–३) सुरेशने पुराव्यात असे सांगितले कि, त्याचे समक्ष आरोपीची अंगझडती घेण्यात आली होती व नंतर आरोपीने त्याचे सक्षम निवेदन (नि. क्र.२१) दिले होते. निवेदनानूसार आरोपीने खार रेल्वे स्टेशन येथील पडक्या इमारतीचे छत दाखविले होते, परंतू छतावर काहीही मिळून आले नाही. त्याबाबतचा पंचनामा (नि. क्र.२२) वर त्याची सही आहे.

१०. अशा प्रकारे (स.सा.क्र.–१) बिनाचे पुराव्यावेळी एवढेच दिसून येते कि, घटना तारीख, वेळी व ठिकाणी तिचे मोबाईलची चोरी झाली होती. (स.सा.क्र.–२) शुभमचे पुराव्यावरून असे दिसून येते कि, तो आरोपीच्या पाठीमागे धावला होता व त्याने आरोपीस स्टेशनचे इमारतीचे छतावरून पकडले होते. आरोपीकडे गुन्ह्यातील चोरी झालेला मोबाईल मिळून आला नव्हता. (स.सा.क्र.–३) सुरेशचे पुराव्यावरून असे दिसून येते कि, आरोपीने गुन्ह्याबाबत निवेदन दिले होते, परंतू त्या निवेदनानूसार कोणतीही मालमत्ता जप्ती झालेली नाही. अभियोग पक्षाचे कथनानूसार आरोपीने जे ठिकाण दाखविले होते, त्या ठिकाणी सर्व सामान्य इसमास प्रवेश होता. त्या ठिकाणावर अशी कोणतीही चिज वस्तू मिळून आली नाही की, ज्या योगे आरोपीचा प्रस्तूत गुन्ह्यात सहभाग दर्शविता येईल.

११. आरोपीने दिलेल्या निवेदनानूसार काहीही जप्ती झालेले नसल्याने, सदरचे निवेदन हे भारतीय पुरावा कायदा १८७२चे कलम २५ सदरात मोडते व त्यामूळे पोलीसांकडे गुन्ह्या बाबत दिलेली कबूली ही ग्राहय धरता येणार नाही. हे सर्वश्रूत आहे की, संशय कितीही गाढ असला तरीही त्यावरून आरोपीला शिक्षा करता येणार नाही. सादर करण्यात आलेला प्रत्यक्ष व परिस्थितीजन्य पुरावा आरोपीने मोबाईलची जबरी चोरी केली, हे सिध्द करण्यास पुरेसा नाही, करीता मुद्दा क्र.–१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहे व आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र.–२ वरील उत्तराकरीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१ आरोपी नामे साबीर रशिद खान उर्फ बाबू, यास भारतीय दंड संहिता कलम ३९२ अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपी बंदिगृहात असल्यामूळे इतर प्रकरण वा गुन्ह्यात आरोपीची आवश्यकता नसल्यास त्यास सोडून देण्यात यावे, येणेप्रमाणे तुरूंगाधिकारी यांस कळवावे.

३ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) नुसार ₹१५,०००/— (पंधरा हजार फक्त) चा वैयक्तिक जातमुचलका बंधपत्र, पुरवावेत.

४ सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

स्वाक्षरी/—
(जी. पी. बावस्कार)
महानगर दंडाधिकारी,
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल,
मुंबई.

दि.:—२४/०१/२०२०.
सराद.

श्रुतलेखन दिनांक. :— २४/०१/२०२०
प्रतिलेखन दिनांक. :— २४/०१/२०२०
स्वाक्षरी दिनांक. :— २४/०१/२०२०
सराद.

Digitally signed by Gopal Pandhari Bawaskar
Date: 2020.01.27 11:57:33 +0530